# प्राचीन भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

**विभाग दुसरा**

## ● स्वधर्मे निधनं श्रेय:–

व्यक्तिस्वातंत्र्याच्या जपणुकीसाठी, सत्ता विकेंद्रीकरण साध्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना, भारतीय राजकीय विचार आणि आचारांत फार मोठें स्थान असल्याचे आपणास आढळून येईल. भारतीय संस्कृतीचा पिंडच स्नेहमयी व सहिष्णु. विवेक आणि आत्मसंयमावर भर फार. त्यामुळे सहकार्य आणि स्वेच्छेनुसार स्वातंत्र्याचा (मर्यादित) अनुभव घेणें हा प्राचीन भारतीय राजकीय विचाराचा गाभा.

त्या वेळच्या राजकीय विचारांत 'स्वधर्म' या शब्दाची व्याख्या फार विस्तृत अर्थाने केली जात असे. प्रत्येक घटकाचा म्हणून स्वधर्म असे. जसा राजाला राजधर्म होता, तसा प्रजेला प्रजाधर्म होता. मोक्षाच्या कल्पनेंत प्रत्येक व्यक्तीचे सर्वश्रेष्ठ श्रेयस् आणि प्रेयस् साठवले असल्याचे सांगितले जात असे. राजधर्माने अनिर्बंध राजसत्तेला प्रजाधर्माने अनिर्बंध प्रजाधिक्याला आणि मोक्ष इच्छेने व्यक्तीच्या अनिर्बंध वर्तनाला सहाजिकच आळा बसत असे. अंतिमतः राजा, प्रजा अथवा व्यक्ती, स्वेच्छाचारी बनणें अशक्य होई. कारण प्रत्येक घटक (स्व) धर्म नियमानें बांधलेला असे. जेथें स्वातंत्र्याचा, स्वाधिकारांचा उपभोग, बंधनाची प्रतिष्ठा राखून घतला जातो, तेथेच कायद्याचे राज्य (Rule of Law) असूं शकते आणि असे कायद्यान्वित राज्य आणणे हे कोठल्याही राज्यसंस्थेचे आदर्श ध्येय होय. प्राचीन भारतात ह्या दृष्टीने विचार व आचार असल्याचे अनेक दाखले आपणास उपलब्ध होऊ शकतात.

## ● कौटिल्यीय राज्यरचना–

प्राचीन तसेच अर्वाचीन भारताच्या इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास नवदृष्टीनें होणे आवश्यक झाले आहे. विशेषतः प्राचीन भारतीय इतिहास हा फार उद्‌बोधक असल्याने त्याचा डोळस अभ्यास आज निकडीचा आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीला व्यक्तिस्वातंत्र्याची कदर फार. तत्कालीन प्रचलित राजकीय व सामाजिक विचार आणि आचारावरून आपणास त्याचा पडताळा लाभू शकतो. उदाहरणार्थ– इसवी सन–पूर्व तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' नामक ग्रंथात स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थान, अधिकार, मर्यादा तसेच प्रभाव ह्याविषयी दीर्घ चर्चा केली असल्याचे आपणास आढळते.

गुप्त कालीन स्थानिक संस्थांना जे एक महत्वपूर्ण स्थान होते ते अजूनदेखील स्वतंत्र भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त झाले नाही.

## ● ग्रामसभा–

गावातील नियुक्त किंवा निवडलेल्या वृद्ध व अनुभवी पंचांची ग्रामसभा बनत असे. अशा ग्रामसभांना, कारभारविषयक, आर्थिक तसेच न्यायविषयक अधिकार असत. ग्रामसभांच्या

संमतीशिवाय राजा कर लादू शकत नसे. ग्रामसभाद्वारा राजसैनिकांची भरती करण्याची प्रथा त्यावेळी अंमलात होती. ग्रामसभांकडेच करवसूलीचे काम सोपवलेले असे. ग्रामसभांचा खर्च वजा जाता उर्वरित धन राजकोशात धाडण्याची प्रथा त्यावेळी होती.

अनेक गावे मिळून बनणारी "जानपद सभा" ही तर विभागीय लोकशाही गणली जात असे. अनेक ग्रामप्रतिनिधी मिळून होणारी जानपदसभा ही राजसत्तेतील मोठी भागीदार म्हणून गणली जात असे. राजाने घेतलेले निर्णय पूर्वावस्थेत तसेच उत्तरावस्थेतही जानपदसभांना ज्ञात असत. अप्रिय व अपात्र मंत्र्यांना स्थानभ्रष्ट करण्याविषयी जानपदसभा हट्ट धरू शकत. राज्यारोहण प्रसंगी तसेच राज्य वारसा ठरविण्याबाबत, जानपदसभांचे मत व मान वैशिष्ट्यपूर्ण असे.

● राज्याच्या त्रिशक्ति—

सारांशाने असे मानता येईल की राजाची व राज्याची सारी शक्तिकेंद्रे, "जानपदसभा व ग्रामसभा" ह्यांच्या मार्फत नियंत्रित होत असत. उदाहरणार्थ— करसंमती व करवसूलीद्वारा राजाची "कोशशक्ति," राजनिर्णय, राज्यारोहण, वारसा इत्यादिद्वारा राजाची "मंत्रशक्ती" आणि सैनिककांच्या भरतीद्वारा राजाची "प्रभुशक्ति" तत्कालीन स्थानिक अथवा प्रातिनिधिक स्वराज्य संस्थाच बनवीत असत. "दण्ड शास्ति प्रजा: सर्वे" असे सांगणारे चाणक्य हे प्रच्छन्न सत्तावादी असल्याचे सांगितले जाते. पण राजावर, राजधर्माने, त्याच्या त्रिशक्तीवरील बंधनांनी, आणि त्याच्या सप्तांगाच्या वर्णनांनी आर्य चाणक्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारा, निरंकुश राज्यसत्तेला, लोकसत्तेचा अडसर घातल्याचेच आपणास आढळते.

● स्थानिक स्व. संस्थांची चैतन्य-गंगा—

प्राचीन भारतातील राज्यसंस्था व शासन संस्था ह्या जनशक्तीची जाणीव असणाऱ्या, लोकाभिमुखी व लोकहितैषी कशा होत्या ह्यांची अनेक उदाहरणे व पुरावे आपणास लाभू शकतात. प्राचीन भारतीय स्थानिक स्वराज्यसंस्था ह्या लोकसत्ताक असल्यामुळेच अर्वाचीन काळातील ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत त्या टिकू शकल्या. सुमारे पाच हजार वर्षापर्यंत व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखणाऱ्या राज्यसत्तेला मर्यादित राखणाऱ्या स्थानिक प्रतिष्ठा उंचावून, स्थानिक निष्ठा जोपासणाऱ्या, भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, आजही आपणास मार्गदर्शक ठरण्याच्या प्रतीच्या आहेत.

आर्य, अनार्य, द्रवीड, गुप्त, हूण, इत्यादि राज्य आणि साम्राज्यकर्ते येथे होऊन गेले. विशाल आणि वैभवसंपन्न भरतभू लुटण्यासाठी अनेक आक्रमक येथे आलेत. येथील संपत्ति, व संस्कृति नष्ट करण्याच्या संकल्पात अनेक शतके रत झालेत, आठव्या शतकापासून झालेल्या यावनी राज्यकर्त्यांनी येथील राज्य व शासनसंस्थेत अनेक स्थित्यंतरे घडविलीत. तदनंतर आलेल्या ब्रिटिशांनी देखील १५० वर्षेपर्यंत येथे शासन केले. थोडा अपवादात्मक काल आणि स्थळे सोडल्यास, गेली दीडहजार वर्षे भारत हा परदास्य आणि धर्मग्लानीतच असल्याचे भासते. परकीय आक्रमकांची व साम्राज्यांची उलथापालथ घडणाऱ्या ह्या भारतात मात्र वरील अनेक आवर्त प्रत्यावर्तांच्या खाली असलेली स्थानिक स्वराज्य संस्थानी परंपरा आणि प्रकृति मात्र अस्पर्श आणि अभंग राहिली. भारतीय स्थनिक स्वराज्य संस्थांच्या ह्या दीर्घायुषी, चैतन्यमय अस्तित्वाबद्दल अनेकांनी प्रशंसोद्गार काढल्याचे आढळते.

The characteristic of Indian village life has been handed down with Extra ordinary pertinacity from a

distant past. असे उद्गार व उल्लेख आपणास विपुल आढळतात. अनेक राज्ये आलीत आणि गेलीत. आक्रमक, क्रूर परकीयांनी येथील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवन विस्कळित करण्याचे अनेक प्रयत्न केलेत. पण सर्वात खालच्या स्तरावर असणारी स्थानिक स्वराज्य बंस्था मात्र अतुल्य अशा चिकाटीने आणि जीवनशक्तीने टिकून राहिली, ही फार मोठी विस्मयकारक घटना भारतीय इतिहासात आढळून येते.

